लीला आणि पावसाचे रहस्य


डेविड कोनवे



मराठी : अश्विनी बर्वे

लीला आणि पावसाचे रहस्य






आठवडे आणि महिन्यांपासून सूर्याचे धगधगते ऊन, केन्या गावाला आपल्या गरमीने त्रस्त करत होते. लीला त्याच गावात राहत होती.




उष्णता एवढी होती की लीला, तिची आई आणि भाऊ आणि इतर सर्व गाववाले सूर्याच्या उष्णतेने भाजण्यापासून वाचण्यासाठी आपल्या घरामध्येच राहत होते.




जाळण्यासाठी लाकडं गोळा करण्यासाठी जाणं अशक्य होतं.



गावातली बाग निंदणे .



पण कठीण होतं.



गायीचे दूध काढण्यासाठी सुद्धा खूप गरम होते.




एका रात्री लीला आईचे बोलणे ऐकते की त्यांच्या विहिरीचे पाणी आटले आहे आणि पिकं उष्णतेशी झुंजत आहेत. “पाण्याशिवाय जीवन शक्य नाही,” लीलाने आपल्या आईचे बोलणे ऐकले.




लीलाला खूप वाटे की सूर्याचे चमकणे बंद व्हावे आणि पाऊस यावा. पण सूर्याने चमकणे बंद केले नाही आणि पाणी पडले नाही.

एकदा संध्याकाळी लीलाचे आजोबांनी एक माणसाची कहाणी सांगितली.ज्याला ते त्यांच्या लहानपणी भेटले होते. त्या माणसाने आजोबांना पाऊसाचे रहस्य सांगितले होते. “तू सगळ्यात उंच पर्वतावर चढ,” तो माणूस लीलाच्या आजोबांना म्हणाला, “आणि मग आकाशाला आपल्या दुःखी जीवनाबद्दल सांग.”








लीलाने आपल्या आजोबांची गोष्ट लक्षपूर्वक ऐकली.दुसऱ्या दिवशी सकाळी सूर्य उगवला नव्हता तोच लीलाने गाव मागे सोडलं आणि सगळ्यात उंच डोंगर तिने शोधून काढला.



लीला चालत गेली, चालत गेली आणि चालत राहिली.शेवटी ती एका उंच डोंगराच्या पायथ्याशी पोहचली..



हळूहळू लीला पहाडावर चढू लागली आणि मग ती उंच आणि खूप उंच जावू लागली..




जेव्हा लीला डोंगराच्या शिखरावर पोहोचली, तेव्हा तिने आकाशला तिच्या आयुष्यातील सर्व वाईट गोष्टी सांगायला सुरवात केली.




सगळ्यात पहिले, तिने त्या घटनेच्या बाबत सांगितलं जेव्हा एका कोंबड्याच्या पाठलाग करत असतांना तिच्या भावाचा पाय कापला गेला होता. मग तिने ते सांगितलं की जेवण तयार करतांना आईला मदत करतेवेळी तिची बोटं भाजली.




लीलाने आकाशाला सगळ्या दुःखद घटना सांगितल्या ज्या तिच्या जीवनात घडल्या होत्या.पण तिला आकाशात पावसाचे कोणतेच संकेत दिसले नाही. अजूनही आकाश निळे आणि सूर्य अजूनही खूप चमकत होता.






लीला रडू लागली.

“सांग मी काय करू?” लीलाने आकाशाला म्हटलं. “एवढी गरमी आहे की आम्ही सरपणासाठी लाकडं गोळा करू शकत नाही, बागेतला घास कापू शकत नाही, आणि गाईचे दूध काढू शकत नाही.आमच्या विहिरी सुकल्या आहेत आणि पीकं नष्ट होत आहेत. पीक आलं नाही तर खाण्यासाठी एक दाणाही राहणार नाही. अन्नाशिवाय गावातले लोक आजारी पडतील आणि पाण्याशिवाय कोणीही जिवंत राहणार नाही.”




डोंगराच्या टोकावर सगळं काही शांत होतं. लीलाच्या रडण्याशिवाय कोणताच आवाज येत नव्हता.



तेव्हा हवा आली आणि ज्यामुळे लीलाच्या पाया जवळची धूळ नाचू लागली. पांढऱ्या पक्ष्यांच्या झुंडी सारखे आकाशात ढग येवू लागले आणि त्यांनी हळूहळू सूर्याच्या चमकणाऱ्या किरणांना रोखलं.



ढग भरू अधिक भरू लागले आणि लीलाच्या मनातल्या दुःखाने भरत गेले. आणि शेवटी आकाशात शोकाच्या भावने बरोबर एकदम काळे झाले.



अचानक आकाशात वीज चमकली आणि ढग गरजण्याचा आवाज जोरात सगळ्या डोंगरावर गुंजू लागला.



लीलाने आपल्या पायावर पावसाचा पहिला थेंब पडण्याचा कोमल स्पर्श अनुभवला.



मग एक आणि
मग दुसरा आणि मग
तिसरा थेंब



शेवटी सगळी जमीन पावसाच्या अश्रुनी भरून गेली.





लीलाने खुशीत रडत आकाशाकडे आपले हात उंचावले. तिला प्रत्येक थेंब आईच्या पापीसारखा वाटत होता.



मग जितक्या लवकर शक्य होईल तेवढ्या लवकर लीला पटकन पर्वतावरून खाली उतरली.

जेव्हा ती घरी पोहचली, तोपर्यंत सगळे गाववाले संगीत आणि नाच करत पावसाचा उत्सव साजरा करत होते.







लीलाला घरात सुरक्षित आणि स्वस्थ बघून आईला फार बरं वाटलं. आईने तिला जवळ घेतलं आणि आजोबा असे हसले की त्यांना सगळं माहीत होतं.



केवळ लीला आणि आजोबांना माहीत होतं की तिने पावसाच्या रहस्यामुळे गावाला वाचवले होते.

समाप्त